**शिकवण..**

मी पण शिकलेय आता, मुखवटे पांघरून जगायला-
हसू ओठांवर आणत, दुःख मनात साठवायला !

आपली सुद्धा परकी वाटतात, माणसं इतकी नाटकी वागतात,
साधेपणा जाणून तुमचा, आपला डाव बोभाट साधतात !

तुमचे-आमचे म्हणत म्हणत, केसानेच गळा कापतात,
'दुखलं का?' म्हणून कधी, वर साळसुदपणे विचारतात !

मी पण शिकलेय आता, या साऱ्यात मिसळायला,
एकेकाचे स्वभाव ओळखत, त्यांच्यातच रमायला !

मनाला पटत नसले तरी, ती काळाची गरज आहे,
जगाकडून मिळणारी मला, ही एक मोठी समज आहे !

एवढं करत असताना वाटतं, आपलं स्वत्वं जपायला हवं,
सोंगाड्यानच्या खेळात या, फारच सांभाळायला हवं !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**